## थोडक्यात...

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कंटेनर चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) जुना तुळजापूर नाका ते पुणे नाका कडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर विनायक कन्स्ट्रक्शन समोर नाजीम आमिन खान (वय-२२-,रा. मुपो.भुवाका,ता.उमरेन,जि.अलवर,रा. राजस्थान) याने त्याच्या ताब्यातील कंटेनर क्रमांक आर.जे.०२ जीसी.५१६३ हा भर धाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून एक अनोळखी महिला (वय-५० ते ५५) हिला मागून धडक देऊन फरफटत नेऊन तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.अशा आशयाची फिर्याद पोलीस हवालदार श्रीकांत पवार (नेमणूक जोडबावी पेठ पोलीस ठाणे) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून नाजीम खान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ४ ऑक्टोंबर रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास जुना तुळजापूर नाका येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोसई.येडे हे करीत आहेत.

### स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचं जीवनकार्य उलगडणार



सोलापूर : 'कर्मयोगी आबासाहेब' हा चित्रपट २५ ऑक्टोबरला मराठी आणि हिंदी भाषेत जगभर रिलीज होत आहे.या चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर नुकतेच लाँच करण्यात आले आहे.वारकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या सर्वसामान्य कुटुंबात जन्माला येऊन सांगोला मतदारसंघातून स्वर्गीय गणपतराव देशमुख तब्बल ११ वेळा आमदार म्हणून निवडून आले होते.तब्बल ५५ वर्षे त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केले.स्वर्गीय गणपतराव देशमुख म्हणजेच ऊर्फ आबासाहेब यांचं जीवन आणि कार्य आता चित्रपटातून उलगडणार आहे.अभिनेता अनिकेत विश्वाससव ही भूमिका करणार आहे.मायका माऊली फिल्म प्रॉडक्शन आणि मुंबई क्रिएशन एंटरटेन्मेंटच्या मारुती तुळशीराम बनकर,बाळासाहेब महादेव एरंडे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अल्ताफ दादासाहेब शेख यांनी चित्रपटाचं-लेखन,गीतलेखन आणि दिग्दर्शन केले आहे.

# अक्कलकोटच्या भूमिगत गटार योजनेस मान्यता

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची माहिती; १६८ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**अक्कलकोट / कमलाकर सोनकांबळे**

अक्कलकोट येथे १६८ कोटी ७९ लाख रुपयाच्या भूमिगत गटार प्रकल्प योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र नगरोत्थान महाभियान मलनिस्सारण प्रकल्प योजनेस मंजुरी मिळाली आहे. योजनेसाठी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. योजनेसाठी मंजुरी मिळून निधी मिळावा म्हणून आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. मोठ्या सार्वजनिक मलनिस्सारण व्यवस्थेत

भूमिगत गटाराच्या माध्यमातून जोडलेल्या प्रत्येक घरातून गोळा झालेला शौच, इतर घाण व सगळे सांडपाणी नलिकांद्वारे गोळा करून मलनिस्सारण प्रकल्पात पाठवले जाते.

तेथे त्याच्यावर भौतिक व रासायनिक प्रक्रिया होऊन सगळी पाण गाळून स्वच्छ पाणी तयार केले जाते. त्यामुळे, ते पाणी पिण्याचा व घरगुती वापर सोडून इतर कुठल्याही जसे बांधकाम, बागकाम, शेती, गाडी धुणे इत्यादी कामासाठी वापरले जाऊ शकते.

प्रकल्पासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे सहकार्य लाभल्याचे कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

महायुतीचे सरकार आल्यानंतर पुन्हा एकदा मतदारसंघातील विकास कामे जलद गतीने सुरू झाली आहेत. अक्कलकोट शहर भुयारी गटार योजनेस शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे अक्कलकोट शहरातील सांडपाणी व्यवस्थापन व स्वच्छतेस अधिक मदत होणार आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत अक्कलकोट नगरपरिषदेचा मलनिस्सारण प्रकल्पाचा प्रस्ताव राज्यस्तरीय मान्यता समितीकडे सादर केला होता. यासाठी आमदार कल्याणशेट्टी यांचा पाठपुरावा सुरू होता. त्या अनुषंगाने प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. प्रकल्पास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत सादर केलेल्या अक्कलकोट मलनिस्सारण प्रकल्पास शासन निर्णयातील अटी, तरतुदीच्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या अधीन राहून प्रकल्पास मंजुरी दिली आहे.

**महाअभियानाची प्रमुख उद्दिष्टे**

अक्कलकोट नगर परिषद प्रस्तावित भूमिगत गटार यंत्रणेचा तपशील खालील प्रमाणे आहे. अक्कलकोट शहराची भूमिगत गटार योजना ही गेल्या ३० वर्षांपासून मंजुरीच्या प्रतीक्षेत होती. पुढील ३० वर्षांसाठी म्हणजेच २०५६ च्या लोकसंख्येसाठी प्रस्तावित केली आहे. सद्यस्थितीत अक्कलकोट शहरात ओपन ड्रेनेज सिस्टीम आहे आणि सांडपाणी गोळा करण्याची व्यवस्था, उपचार आणि विल्हेवाट नाही. उघड्या नाल्यांमुळे अस्वच्छ वातावरण, साथीचे रोग होऊ शकतात. त्यावर हाताळण्यासाठी भूमिगत गटार योजना हा सर्वोत्तम उपाय असू शकतो. भविष्यातील मागणीचा विचार करून सांडपाणी व्यवस्थापनाची पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि सीवरेज सिस्टीमच्या क्षेत्रात दर्जे दार सेवा प्रदान करणे हा प्रकल्पाचा उद्देश आहे. शहरातील सर्व घन पाणी या मलशुद्धीकरण केंद्राद्वारे प्रक्रिया करून राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या नियमानुसार पर्यावरण पूरक प्रक्रिया केलेले पाणी लगतच्या नाल्यात सोडणार आहे. तसेच शेती व बाग कामासाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे.

### आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध कामाचे भूमीपूजन व सभा

### लवकरच काम सुरु होणार

**योजनेसाठी १६८ कोटी ७९ लाख रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. योजनेच्या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच काम सुरु होणार आहे. योजनेचे काम वेळेत पूर्ण करून यासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून कामाची नियमित तपासणी करणार आहे. त्यामुळे लवकरच अक्कलकोट शहर स्वच्छ सुंदर होण्यास मदत होणार आहे.**

# शाश्वत विकासाचा ध्येय ठेवून गावचा सर्वांगीण विकास करा : बीडीओ कवितके



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानमंगरुळ (प्रतिनिधी): जागतिक संघटनेच्या निर्देशाप्रमाणे ९ थीम १७ गोल्स संकल्पना मनात ठेवून शाश्वत विकासाचा ध्येय ठेवून गावचा सर्वांगीण विकास करणे हा हेतू ठेवून प्रत्येक नागरिकांनी लोकसहभागात भाग घेणे गरजेचे असते असे आवाहन अक्कलकोट पंचायत समितीचे बीडीओ शंकर कवितके यांनी पानमंगरुळकरांना केले.

महात्मा गांधी जयंती निमित्त सक्षम पंचायत विकसित भारत. देशातील ७५० ग्रामपंचायतीची निवड केली होती. त्यामध्ये अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ ग्राम पंचायतीचा समाविष्ट करण्यात आला होता. प्रथम पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रत्नाबाई धोंडप्पा महाजन या होत्या.

अभियानाचा मुख्य संकल्पनेनुसार नशामुक्त भारत व निरोगी भारत, ज्येष्ठांचा सन्मान, स्वच्छता हिच सेवा याबाबन प्रतिज्ञा देण्यात आली. वृक्षारोपण करण्यात आले. आंगणवाडी कडून अक्षरज्ञान स्टॉल ठेवण्यात आला होता. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले व पुरस्कार प्राप्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

माजी गटविकास अधिकारी महादेव बेळ्ळे यांनी जेष्ठांचा महत्त्व व आमचा गाव आमचा विकास याविषयी मार्गदर्शन केले. सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामस्थांच्या सहयोगाने प्रभात फेरी काढण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे निती आयोग समन्वयक प्रिती रोकडे, नोडल अधिकारी निकिता गायकवाड, ग्राविअ शिवानंद सोलापूरे, उपसरपंच मलिक मुजावर, महादेव महाजन, अकबर मुजावर, उदय नानजकर, सतिश पवार, अशपाक मुजावर, रियाना मुजावर, ललिता उडासे, सचिन बनसोडे, अण्णप्पा अरबाळे, सुगलाबाई कत्ते, श्रीदेवी पुजारी, जयश्री पवार, सिद्धव्वा बनसोडे, महादेव सुंकद, रेखा मुडगी आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, वैद्यकीय अधिकारी पटेल, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा वर्कर्स, बचत गट महिला, ग्रामपंचायत कर्मचारी व गावकऱ्यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे व आभार ग्राविअ शिवानंद सोलापुरे यांनी मानले.

### यांचा झाला सन्मान

**कृष्णात कदम, शहाजी पवार, सिद्धाराम ठमके (जेष्ठ नागरिक), सुभाष मंगरुळे, हरिश्चंद्र गायकवाड, शिवबाळ मुली, रमेश कत्ते, अकबर मुजावर, जिलानी मुजावर( सेवानिवृत्त अधिकारी व शिक्षक), मुख्याध्याप सी. बी. पुजारी, महादेव जंबगी, सिध्दू मुली).**

# सुरवड येथे होम मिनिस्टर कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : नवरात्रोत्सवाच्या पावन मुहूर्तावर सोनाई प्रतिष्ठानचे संचालक तथा माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे श्री प्रवीण माने यांच्या माध्यमातून सुरवड येथील श्रीकृष्ण मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेला होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

प्रविण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या या होम मिनिस्टर कार्यक्रमाच्या निमित्ताने इंदापूर तालुक्यातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. रोजच्या त्याच त्याच कामाच्या व्यापातून महिला भगिनींना एखादा आनंदी क्षण मिळावा या विचारांतून आपण हा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे प्रतिपादन यावेळी माने यांनी केले.

यावेळी कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेस मानाची पैठणी साडी भेट देण्यात आली होती.

तर प्रमुख बक्षिसांमध्ये प्रथम क्रमांकाच्या पारितोषिक साठी एल इ डी टीव्ही, द्वितीय पारितोषिक फ्रीज, तिसऱ्या क्रमांकासाठी कुलर तर चौथ्या क्रमांकाला पिठाची चक्की आणि पाचवे पारितोषिक मिक्सर देण्यात आला.

या कार्यक्रमात सराटी गावच्या ऐश्वर्या गणेश शेटे यांना प्रथम क्रमांक, शेटफळ हवेलीच्या प्रियंका समीर साठे यांना द्वितीय क्रमांक, भांडगावच्या दीपिका महिंद्र गावडे यांना तृतीय क्रमांक तर सुरवडच्या वैष्णवी सोमनाथ फुलसुंदर यांना चौथ्या व सुरवड गावच्या पायल बापूसो सुर्वे यांना पाचव्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, भरत शेठ शहा, महारुद्र पाटील, रवीं तेजसिंह पाटील, सागर मिसाळ, छायाताई पडसळकर, अनिकेत निंबाळकर, किरण लावंड, अमोल मुळे, समद सय्यद, बाळासाहेब कोकाटे, आदर्श तरंगे, दत्तात्रय तोरस्कर, नानासाहेब पोळ, बापू जामदार, अभिजीत घोगरे, समाधान बोडके, नागेश गायकवाड, अंकुश दोरकर, नितीन मगर, अरुण घोगरे, बापू जामदार, कैलास येरळकर, मोहन काटे, विजय घोगरे, सुरेश कोकाटे, सनी बंडगर, रोहन लावंड, अशोक घोगरे व समस्त माने कुटुंबीय यावेळी उपस्थित होते.

### प्रविण माने यांच्या माध्यमातून महिलांनी अनुभवला आनंद सोहळा




# टाकळीवाडी मध्ये दुर्गामाता दौंडला उस्फुर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पत्रकार नामदेव निर्मळे/शिरोळ : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान टाकळीवाडी यांच्यावतीने घटस्थापना ते विजयादशमी पर्यंत दुर्गामाता दौंड सुरू आहे.

यामध्ये लहान बालकांची उपस्थिती लक्षवेधी ठरत आहे. श्री सरस्वती हायस्कूल शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, तसेच जिल्हा परिषद कुमार विद्यामंदिर शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने दौंडला उपस्थित असतात. वयोवृद्ध नागरिक सुद्धा मोठ्या संख्येने या दौंडला प्रतिसाद देत आहेत..



**मंगळवेढा उपसा सिंचन योजनेचे उद्घाटन** — **उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# दुष्काळी तालुका हा कलंक पुसण्यासाठी पुन्हा एकदा अवताडे यांना आशीर्वाद द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाने पोटनिवडणुकीमध्ये माझ्या शब्दाला मान देऊन समाधान आवताडे यांना विधानसभेत पाठवलं मी मतदार संघाला दिलेल्या शब्दाप्रमाणे सरकारचा करेक्ट कार्यक्रम केला आणि मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला निधीही दिला मी जे बोलतो ते करतोच समाधान आवताडे यांनी मोठ्या प्रमाणात या मतदारसंघाला निधी मंजूर करून घेतला आहे हा विकासाचा रथ यापुढे असाच सुरू ठेवण्यासाठी पुन्हा एकदा समाधान आवताडे यांच्या पाठीशी उभे राहा असे आवाहन राज्याची उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंधळगाव येथे बोलताना केले.

ते मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते या उद्घाटन प्रसंगी पंढरपूर एमआयडीसी, कर्जाळ कात्राळ ते नॅशनल हायवे रस्ता व तामदर्डी बंधारा या कामाचे उद्घाटन डिजिटल प्रणाली द्वारे करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आमदार सुभाष बापू देशमुख, आमदार राजेंद्र राऊत, आमदार सचिन कल्याणशेट्टी, चेतनसिंह केदार, उद्योगपती संजय आवताडे दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ अवताडे, विजयसिंह देशमुख अप्पर सचिव दीपक कपूर, गोणेवाडी चे सरपंच रामेश्वर मासाळ सरपंच विजय माने, विनायक यादव, चांगदेव कांबळे, तानाजी काकडे ,धनंजय पाटील, सुरेश भाकरे दीपक सुडके यांचे सह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की समाधान दादांना निवडून द्या तुम्हाला आश्वासने अनेक मिळाली असतील पण मी मंगळवेढ्याच्या शिवारात पाणी आणून दाखवीन असं आश्वासन दिलं होतं ते आश्वासन मी पूर्ण केलं असून तुम्ही तुमचं एक मत समाधान ला दिल त्या समाधान आवताडेनी तुमच समाधान करून दाखविले आहे.

ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या त्या गोष्टी आम्ही शक्य करून दाखवल्या आहेत या मतदार संघावर पडलेला दुष्काळाचा कलंक पुसून हा मतदार संघ नंबर एक वर आणल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. विकासासाठी पाणी हे फार महत्त्वाचा असून पाण्याने शेती उद्योग या सर्व गोष्टी होत असतात त्यामुळे शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून आमच्या सरकारने शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी दूर करण्याचे प्रयत्न केले आहेत सध्या आम्ही शेतकऱ्यांना वीज मोफत दिली आहे येत्या काही महिन्यात शेतकऱ्यांना दिवसा १२ तास शेतीपंपाचे वीज मोफत देण्याचे आम्ही नियोजन केले आहे एक रुपयात विमा सुरू केला आहे लाडक्या बहिणींना महिना दीड हजार रुपये या सरकारने दिले आहेत हे सर्वसामान्यांचे सरकार असून या सरकारच्या पाठीशी तुम्ही रहा या मतदारसंघाचे आणि नंदनवन करून दाखवू असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित यांना दिला .

यावेळी प्रास्ताविक प्रास्ताविक भाषणात बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की मी जे जे मागेल ते तुम्ही मंजूर करून दिले आहे विज बिल माफीचा निर्णय तुम्ही घेतल्यामुळे या मतदारसंघातील ४८ हजार लोकांना याचा लाभ झाला आहे म्हैसाळ योजनेसाठी तुम्ही केंद्र व राज्याकडून १३ हजार कोटी रुपये दिल्यामुळे या मतदारसंघातील १९ गावांच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे उपसा सिंचन योजनेलाही ७०० कोटी रुपये देत आज प्रत्यक्षात या कामाला तुमच्यामुळे सुरुवात होत आहे भूगोलाच्या पुस्तकांमध्ये हा तालुका दुष्काळी तालुका म्हणून नोंद होती मात्र तुमच्या या निर्णयामुळे आगामी काळात शेती क्षेत्रात अग्रेसर तालुका म्हणून या तालुक्याची नोंद होईल या अगोदरच्या काळात चाळीसगावची प्रादेशिक योजना अस्तित्वात आली मात्र निकृष्ट कामामुळे तीन वर्षापासून खर्च करून ही योजना व्यवस्थित चालत नाही सध्या ही योजना शिखर समितीकडे असून समितीला ही योजना चालवणे शक्य नाही पुन्हा ती योजना एमजीबी कडे देत दुरुस्तीसाठी निधीची आवश्यकता आहे पंढरपूर एमआयडीसी मंजूर केल्यामुळे येथील तरुणांना आता बाहेरच्या शहरात न जाता इथेच काम मिळणार आहे आम्ही मागायला कमी पडत नाही तुम्ही द्यायला कमी पडू नका असे म्हणत आमदार अवताडे यांनी भरघोस निधी दिल्याबद्दल फडणवीस यांचे आभार मानले. या कार्यक्रम प्रसंगी विनोद लटके,अशोक चौंडे विकास पुजारी,प्राजक्ता बेणारे,प्रसाद कळसे, अनिल यांनीही आपली मनोगते व्यक्त केली यावेळी भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, राजेंद्र सुरवसे, शिवाजीराव नागणे, नवनाथ पवार, दिलीप चव्हाण, सचिन शिवशरण, रामेश्वर मासाळ, माजी संचालक बापूसाहेब काकेकर, चंद्रकांत पडवळे, जगन्नाथ रेवे, राजन पाटील, वृषाली पाटील बी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मिसाळ व भारत मुढे यांनी केले.

**मंगळवेढा तालुक्यातील सर्व ग्रामदैवतांच्या पालख्या कार्यक्रम स्थळी आणून ग्रामस्थांनी फडणवीस यांच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती त्याचबरोबर २४ गावातील माती गोळा करून कळस पूजन ही करण्यात आले**







# आ. सचिन कल्याणशेट्टी

# मध्यांतर...

## आपला माणूस

आमदार सचिन कल्याणशेट्टी हे अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर गावचे. बी ए, बी एड पर्यंतचं शिक्षण झालेलं. त्यामुळे शिक्षणातून येणारी नम्रता त्यांच्या स्वभावात जाणवते. आदर्श संस्काराचा आणि निस्वार्थ भावनेने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अगदी तरुण वयातच आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा श्रीगणेशा केला.

सचिन कल्याणशेट्टी यांनी वडिलांप्रमाणेच आपल्या राजकीय आयुष्याची सुरुवात हन्नूर गावच्या सरपंचपदापासून केली. भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस आणि आता जिल्हाध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीरित्या पेलल्या. आपल्या सर्वसमावेशक कामाचा एक ठसा उमटवला. सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मोठ्या फरकाने विजय मिळवत त्यांनी आपली क्षमता दाखवून दिली. आमदार झाल्यापासून अक्कलकोट विधानसभा मतदार संघाचा त्यांनी चेहरामोहराच बदलून टाकला. अक्कलकोट तालुक्याच्या विकासाला जणू त्यांनी फास्टट्रॅकवर आणले. शेती, पाणी, वीज, पायाभूत सुविधा, रस्तेविकास, तीर्थक्षेत्र विकास, अक्कलकोट बसस्थानकचे पुनर्निर्माण, रेल्वे उड्डाण पुलाची कामं, सर्वात महत्वाचे म्हणजे उजनीचे पाणी कुरनुर धरणात पोहोचवण्याची ऐतिहासिक कामगिरी त्यांनी केली. गोवा आणि तेलंगणा विधानसभा निवडणुकांमध्येही पक्षाने दिलेली विशेष जबाबदारी सचिन कल्याणशेट्टी यांनी यशस्वी करून दाखवली.

मा. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सामाजिक जाणीवेचं मूर्तीमंत प्रतिक म्हणजे विवेकानंद प्रतिष्ठान. संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी उपक्रम आणि कार्यक्रमाचा धडाकाच लावला. सामान्य,ग्रामीण भागातला शेतकरी, महिला, युवक – युवती यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक कार्यक्रमांची आखणी केली. विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून आजवर शेकडो जोडपी विवाह बंधनात अडकली.

अक्कलकोटची विवेकानंद व्याख्यानमाला आता संपूर्ण महाराष्ट्रात ओळखली जाऊ लागली आहे. या व्याख्यानमालेने अक्कलकोटकरांना चांगलीच बौद्धीक आणि सांस्कृतिक मेजवानीच दिली आहे. महिला, युवती – युवक, शेतकरी, विधवा, परित्यक्त्या, बेरोजगार तरुण अशा सर्व घटकांसाठी विवेकानंद प्रतिष्ठानने कार्य केले आहे.

गेल्या पाच वर्षात अक्कलकोटने जो विकासाचा वेग अनुभवला तो देशाच्या स्वातंत्र्यापासून पहिल्यांदाच मिळाला आहे. अक्कलकोटसारख्या सीमावर्ती तालुक्याने गेले अनेक दशके केवळ उपेक्षाच सहन केली. विकासाच्या बाबतीत सापत्नभावाची वागणूक मिळत राहिली. पण गेल्या पाच वर्षात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटला महाराष्ट्राच्या नकाशावर ठसठशीतपणे आणले आहे हे नक्की!

## ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास





२०१९ ते २०२४ या कालावधीत धोत्री येथील नागनाथ मंदिर, बोरामणी येथील ब्रह्मनाथ मंदिर, मैंदर्गी येथील वीरशैव शिवाचार्य श्रीगुरु संस्थान हिरेमठ, नागणसूर येथील बमलिंगेश्वर मठ, किणी येथील वीरभद्रेश्वर मंदिर, दुधनी येथील मल्लिकार्जुन मठ व अक्कलकोट, मैंदर्गी, हैद्रा, बोरामणी येथील दर्ग्यांचा मोठ्याप्रमाणात निधी देऊन विकास केला.

## मतदारसंघातील आरोग्य सुविधा वाढवल्या !



- डीसीएचसी आणि स्वामी समर्थ रुग्णालयाचे १०० खाटांचे सुसज्ज कोविड हॉस्पीटल उभे करुन दिल्याने अनेक रूग्णांचे प्राण वाचले.
- ६ गावांना प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधकाम केले.





## ग्रामदैवत मल्लिकार्जून मंदिराचा जीर्णोद्धार !

अक्कलकोटचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जून मंदिराचा जीर्णोद्धार केला जात आहे. येणारी हजारो वर्षे हे बांधकाम टिकावे असे तंत्रज्ञान वापरून हे बांधकाम केले जात आहे. सदर मंदिराच्या जीर्णोद्धारसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास विकास महामंडळाच्या माध्यमातून **चार कोटी पन्नास लाख रूपये** इतका निधी उपलब्ध करून दिला.





## अक्कलकोट बसस्थानकाचे पुनर्निर्माण !

बसस्थानक तीन मजली असेल. दोनचाकी, रिक्षा आणि चार चाकी वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळ.११ मोठे व्यापारी गाळे, अत्याधुनिक स्वच्छतागृहे. सर्व सोयींनी युक्त असे कँटीन. कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष. बसेस साठी एकूण 22 फलाट असतील.




- नऊ बहुप्रतिक्षित रस्त्यांचे काँक्रीटीकरण केले जाणार आहे. ग्रामसडक योजने अंतर्गत एकूण ६१ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला.
- दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामीण भागांना जोडणारे प्रमुख जिल्हा मार्ग आणि इतर जिल्हा मार्ग मिळून जवळपास ४४ किमी लांबीचे रस्ते निर्माण केले.
- स्वातंत्र्यापासून आजवर कधीही पूर्ण न झालेल्या तब्बल २४ रस्त्यांच्या कामाचासुद्धा यात समावेश आहे.
- सचिन दादांच्या अथक प्रयत्नांतून १४० रस्त्यांच्या एकूण ५२७ किमीपेक्षा अधिक लांबीची रस्त्यांची कामे झालेली आहेत. यासाठी कोट्यावधी रूपयांचा निधी प्राप्त करण्यात त्यांना यश आले. म्हणूनच त्यांना रोडमॅन म्हटले जाते.

## राष्ट्रीय महामार्ग !

- तिलाटी गेट -वळसंग - तांदुळवाडी, तसेच मुरुम - वागदरी - अक्कलकोट - नागणसूर अशा जवळपास ७५ किलोमिटर रस्त्यांचे मजबुतीकरण, दुरुस्ती यासाठी १२६ कोटी रूपये मुंजूर झाले, कामही पूर्णत्वास गेले आहे.
- मैंदर्गी आणि दुधनी बायपाससाठी २५ कोटी रूपये.
- मुस्ती ते आरळी रस्त्यावरील पुलाच्या कामाचीही मंजुरी मिळाली आहे.
- बोरी उमरगे गावाजवळील नवीन पुलासाठी 35 कोटी रुपये सचिन दादांनी निधी मंजूर आणला.
- उमरगा हद्द ते वागदरी - नागणसूर - बोरोटी बाँड्री पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे, त्यासाठी 580 कोटी रुपये निधी मंजूर करुन आणला.



## शेतकऱ्यांसाठी दिवसा मोफत वीज पुरवठा



● भुरीकवठा, बोराटी, आणि धोत्री या गावात विद्युत उपकेंद्र मंजूर केले. ●२०० किमी लांबीच्या विद्युत वाहिन्या बसविण्यात आल्या.● २५० डिपी बसविले.

## उजनीचे धरणाचे पाणी कुरनूर धरणात !



२४० किलोमिटर प्रवास करून उजनी धरणातून पाणी कुरनूर धरणात पोहोचले.एकूण ४१२ कोटी रूपयांच्या योजनेतून अक्कलकोट तालुक्यातील तीन नगरपरिषदांसह ५१ गावांना पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे. दक्षिण सोलापूर तसेच अक्कलकोट तालुक्यातील १७३१० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले आहे.

## नगरपालिका विकास निधी








अक्कलकोट, दुधनी आणि मैंदर्गी या तिन्ही नगरपरिषदांमधील प्रलंबित विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणावर विकास निधी आणण्यात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना यश आले. यामध्ये क्रीडा मैदानांचा विकास करणे, पेव्हर ब्लॉक टाकणे, बहुउद्देशीय सभागृह बांधणे, ड्रेनेज लाईन टाकणे, वसाहतीमध्ये सिमेंट क्रॉक्रेट रस्ते तयार करणे, पिण्यासाठी पाणी पुरवठा, पाईप लाईन टाकणे, सीसीटीव्ही, सोलर, ई. आता या निधीमुळे तिन्ही नगरपरिषदांच्या विकासाला चालना मिळाला आहे.

## विधानसभा क्षेत्रातील जलसंधारणाची कामे



२०१९ पासून सचिन दादांच्या पाठपुराव्यामुळे ४० गावात जलसंधारणाची कामे झाली. १३ हजार सहस्त्र घन मीटर पाणी साठा वाढला व २९५२ क्षेत्र ओलीताखाली आले. यामध्ये साठवण तलाव, लघुपाटबंधारे तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, पाझर तलाव, गेटेड बंधाऱ्यांचा समावेश आहे.



## दुधनी, अक्कलकोट रोड स्टेशन रेल्वे उड्डाणपूल !

अक्कलकोट स्टेशन येथिल रेल्वे उड्डाणपूल तसेच दुधनी येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम मार्गी लागले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जवळपास १०० कोटी रूपये निधीची यासाठी मंजुरी मिळाली. रेल्वे उड्डाणपूल तसेच ४.१२० किमी रस्त्याची ही कामे मंजुर झाली आहेत. सदरचे काम २४ महिन्यात पूर्ण होऊन देखभाल कालावधी हा १० वर्षांचा आहे.

## जलजीवन मिशन मतदारसंघातील कामे



आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केंद्राकडे पाठपुरावा करून जलजीवन मिशन अंतर्गत ११३ गावांमधील ४२,३४२ कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळवून दिला. यासाठी **१०५ कोटी रूपयांचा** निधी मंजूर झाला.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून अक्कलकोट तालुक्यात ७५ हजार आणि दक्षिण सोलापूरमध्ये २० हजार महिलांच्या खात्यावर १३ कोटी रूपये प्रत्यक्षात जमा झाले आहेत. या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी स्वतः सचिन दादांनी विशेष लक्ष घातले.

